(CNRMHSN110000772020)

फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१०/२०२० नि.१० वरील आदेश

प्रस्तुत कामी जाबदार यांनी दरमहा ३५००/–पोटगी देण्याबाबतचा आदेश माझे पूर्वाधिकारी यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ६८/२०१८ मध्ये केला आहे. त्याप्रमाणे रक्कम न भरल्याने प्रस्तुत रक्कम वसुलीबाबतचा अर्ज या कामी दाखल करण्यात आलेला आहे. निशाणी १ ची नोटीस जाबदार याला निशाणी ६ प्रमाणे बजावली आहे. निशाणी ७ वरील अर्जाप्रमाणे माझे पूर्वाधिकारी यांनी जाबदार याला रिकव्हरीचे वॉरंट काढणेबाबत आदेश केला होता. त्याप्रमाणे रिकव्हरीचे वॉरंट काढण्यात आले परंतु जाबदार याच्याकडे कोणत्याही प्रकारची जंगम मालमत्ताा नसल्याने वारंट न बजावता परत आले आहे.

२. आजपर्यंत जाबदार यांच्यामार्फत अर्जदार हिला कोणतीही रक्कम देण्यात आलेली नाही. अर्जदार हिने अर्ज मुदतीत दाखल केला होता. त्याप्रमाणे ९ जानेवारी २०२० पर्यंत २० महिन्याची पोटगी थकीत आहे. या परिस्थितीत जाबदार यांनी कोणतेही संयुक्तीक कारण नसताना न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे रक्कम भरलेली नाही. त्यामुळे त्याच्याविरुध्द दंडाच्याबाबत जसे वॉरंट काढण्यात येते तसे वॉरंट काढणे गरजेचे आहे. तसेच सदर २० महिन्यांपैकी पहिल्या महिन्याच्या पोटगीची रक्कम न भरल्याने त्याला एक महिन्याचा कारावास सुनविण्यात येतो. येणेप्रमाणे वॉरंट काढण्यात यावे. वॉरंटमधील रक्कम जाबदार याने न दिल्यास त्याला उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे कारावास भोगण्यासाठी अटक करण्याबाबत नमूद करण्यात यावे.

VINAYAK DATTATRAY PATIL

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2022.07.20 10:35:04 +0530

आटपाडी (वि. द. पाटील )

दि.१६.७.२०२२ न्यायदंडाधिकारी,प्रथमवर्ग आटपाडी

(CNRMHSN110000772020)

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - Civil Judge Jr.Dn. Atpadi.
Date - 16.07.2022
Order signed by the
Presiding Officer on - 16.07.2022
Order uploaded on - 20.07.2022